# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/09/2023 (मंगळवार) सकाळ


### नागपूर ग्रामीण जिल्हयाची अवैध धंदयाविरूद्ध विशेष मोहीम

पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो. से.) यांनी आगामी पोळा व गणेशोत्सव सणादरम्यान अवैद्य दारूविरूद्ध विशेष मोहीम सुरू केलेली असुन सदरची मोहीम दिनांक ०६/०९/२०२३ पासुन सुरू करण्यात आली आहे. सदर मोहीमेदरम्यान आजपावेतो ०७ दिवसात नागपूर ग्रामीण जिल्हयात ८८ आरोपीतांवर कार्यवाही करण्यात आलेली असुन जवळपास ०३ लाखाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. सदरची मोहीम अशीच गणेश विसर्जन पर्यंत सुरू ठेवण्यात येणार असुन पोळा व गणपती दरम्यान गुन्हेगारांवर विविध कलमान्वये प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही सुद्धा करणार असल्याचे तसेच अवैध धंदयाचे समुळ नष्ट करण्याचे पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो. से.) यांनी सांगितले.

### जबरी संभोग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. अरोली:— फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे अप क्र. १८६/२० कलम ३६३, ३७६(अ) (ब) भादवि. सहकलम ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील आरोपी नामे— देवाकर काशीनाथ नैताम वय २६ वर्ष रा. शिवनी खात त. मौदा हा फिर्यादीच्या घराशेजारी पाहुना म्हणुन आलेला होता. यातील आरोपीने फिर्यादीच्या अल्पवयीन पिडीत मुलगी ही अंगणात खेळत असताना तिला चॉकलेट घेवुन देतो. असे म्हणुन चॉकलेटचे आमीष दाखवुन गावातील रोडवर असलेल्या शेतात घेवुन गेला. व तिचे सोबत लैगिक अत्याचार केला. पिडीता ही ओरडली असता बाजुचे शेतातील बाई हिने जावुन बघितले तेव्हा आरोपी तेथुन पळुन गेला.

सदर प्रकरणाचे तपास सपोनि. निशा भुते यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश राजकारने सो. कोर्टमध्ये सादर केले. आज दिंनाक १२/०९/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान अतिरीक्त जिल्हा न्यायाधीश यांनी वरील नमुद आरोपीस कलम ८ पोक्सो मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व १००० रू दंड, दंड न भरल्यास १ महीना सश्रम कारावास तसेच कलम ३६३ भादवि. मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू दंड , दंड न भरल्यास १ महीना सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने ए. पी. पी. शेख मॅडम यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोशि शिलन वाघमारे पो.स्टे. रामटेक यांनी मदत केली आहे.


पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर